0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०८/११/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयांची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७४/२०१२/जा.७८१, दिनांक ०७/११/२०१२, १६/११/२०१२ व १०/१२/२०१२.

३) मे. ताज ॲग्रो कमोडिटीज प्रा.लि. व मे. अंकित इंम्पेक्स इंडिया यांचे दिनांक १०/११/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

४) मे. शितल कोल्ड स्टोरेजचे टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदन.

५) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक ०९/११/२०१२ रोजीचा अहवाल.

६) मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स यांचे दिनांक ०५/१२/२०१२ रोजीचे लेखी निवेदन.

७) मे. पुजा ट्रेडर्स व मे. गणेश ट्रेडर्स यांचे दिनांक १८/१२/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७४/२०१२/जा. ५२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १७/०१/२०१३

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आ दे श

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०२/११/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. शितल कोल्ड स्टोरेज, प्लॉट नं. सी/२०, टी.टी.सी. इन्डस्ट्रीअल एरीया, एम.आय.डी.सी., पावणे, नवी मुंबई - ७३ या ठिकाणी अचानक भेट दिली असता, कंपनीच्या कार्यालयात उपस्थित व्यक्तीस श्री. सईद शममुद्दीन शेख यांना अधिकाऱ्यांनी स्वत:ची ओळख सांगून येण्याचे प्रयोजन सांगितले व तपासणीकामी सहकार्य करण्याची विनंती केली. तद्नंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष श्री. सईद शममुद्दीन शेख यांना कंपनीचे मालकाबाबत चौकशी केली असता, या कंपनीचे डायरेक्टर श्री. इम्तीयाज मेहता व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. इकबाल मेहता असून तो सदर ठिकाणी मॅनेजर म्हणून काम करीत असल्याचे सांगितले.

अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर कंपनीमध्ये कोणकोणत्या व्यापाऱ्यांचे व कोणते जिन्नस साठवणूक ठेवले आहेत व साठवणूकीसाठी दस्तऐवज तपासणीकरिता मागितले असता, सदर कंपनीमध्ये विविध व्यापाऱ्यांचे जिन्नस जसे कडधान्ये, फळे व भाज्या साठवणूक करुन ठेवतात व त्यांच्या आवश्यकतेनुसार ते येथून जिन्नस परत घेऊन जातात असे श्री. सईद शममुद्दीन शेख यांनी अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. तसेच व्यापारी कंपनीमध्ये जिन्नस साठवणूकीकरीता आणतांना गेटपास व बिल ऑफ एन्ट्री सादर करतात व त्यांना ठेवलेल्या जिन्नसांची पावती दिली जाते व उचल करताना सुध्दा त्यांच्या मागणी नुसार डी.ओ. द्वारे जिन्नस दिल्या जाऊन त्याबाबतची सुध्दा रीतसर पावती कंपनीमार्फत दिली जाते, असे श्री. सईद शममुद्दीन शेख यांनी अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. तसेच आस्थापना व कंपनी परवानाबाबत व इतर दस्तऐवज कंपनी मालकांकडे असल्याने सादर करुन शकत नाही म्हणून सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी श्री. सईद शममुद्दीन शेख यांना आजमितीस कंपनीमध्ये कोणत्या व्यापाऱ्यांचे किती जिन्नस साठवणूक आहेत याबाबत विचारले असता, त्यांनी संगणकामधून जिन्नस साठ्याबाबतचा माहिति अहवाल दिला. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | व्यापाऱ्याचे नांव | जिन्नस | बाचके | एकुण किलोग्रॅम |
|---|---|---|---|---|
| १ | मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स | हिरवा वाटाणा | ८६५ (५० कि.ग्रॅ.) | ४३२५० |
| २ | मे. अंकित इंम्पेक्स, दिल्ली | राजमा | ३० (५० कि.ग्रॅ.) | १५०० |
| ३ | मे. गणेश ट्रेडर्स | तुरदाळ | २८७ (२५ कि.ग्रॅ.) | ७१७५ |
| ४ | मे. पुजा ट्रेडर्स | तुरदाळ | २७० (२५ कि.ग्रॅ.) | ६७५० |
| ५ | मे. ताज ॲग्रो | तुर | ३७० (५० कि.ग्रॅ.) | १८५०० |
| | | एकूण | १८२२ | ७७१७५ |

उपरोक्त माहिती अहवालानुसार प्रत्यक्ष साठ्याची मोजदाद करण्यासाठी अधिकारी, पंच व कंपनीचे मॅनेजर श्री. सईद शममुद्दीन शेख कोल्ड स्टोरेजमध्ये पोहचले. कंपनीच्या कोल्ड स्टोरेजच्या चार माळ्यामधील जिन्नसांची अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष मोजदाद केली असता, ती वरीलप्रमाणे सादर केलेल्या अहवालानुसार मिळतीजुळती असल्याचे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष आढळून आले. सर्वजण पुन्हा कंपनी कार्यालयात आले व सदर संबंधितील बाबींबाबत कंपनी मॅनेजर श्री. सईद शममुद्दीन शेख यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आला.

अधिकाऱ्यांनी वर नमुद व्यापाऱ्यांना साठ्यासंबंधी पुरावादर्शक कागदपत्रे प्राप्त करुन घेण्यासाठी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतू कोणासोबत संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे सदर व्यापाऱ्यांबाबत माहिती मिळू शकली नाही व कागदपत्रेही उपलब्ध नसल्याने कोल्ड स्टोरेजमध्ये साठवणूक असलेल्या

पाचही व्यापाऱ्यांचा एकूण ७७१.७५ क्विंटल जिन्नसांचा साठा जागीच सिलबंद करुन कंपनीचे मॅनेजर श्री. सईद शममुद्दीन शेख यांचेकडे सुपूर्द करण्यात येऊन त्याचे वितरण कोणासही करु नये अशा सुचना त्यांना देण्यात आल्या.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील कडधान्यांचा विनापरवाना आढळून आलेला साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक १०/११/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. ताज ॲग्रो कमोडिटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जमनादास चांद्रा व मे. अंकित इंम्पेक्स इंडियाचे व्यवस्थापक सुनिल बालकिशन गुप्ता हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर सुनावणीस इतर साठा मालक हे उपस्थित नव्हते. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०५/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०५/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स यांचे व्यवस्थापक मोहम्मद इम्रान पोची हे प्राधिकारपत्रासह उपस्थित राहिले व त्यांचा जप्त साठा हा आयात केल्याचे सांगून वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीसही इतर साठा मालक हे उपस्थित नव्हते. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक १८/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. पुजा ट्रेडर्स या आस्थापनाचे मालक म्हणुन व मे. गणेश ट्रेडर्स या आस्थापनेच्या वतीने त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणुन ललित मणिलाल चव्हाण यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ७ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

दिनांक १०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. ताज एग्रो कमोडिटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जमनादास चांद्रा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा ३७० बाचक्यांमधील पिवळे मसुरडाळीचा १८.५०० मे.टन आयात केलेल्या साठयापैकी शितल कोल्ड स्टोअरेज येथे साठवणुकीसाठी पाठविला असुन त्या अनुषंगाने आपल्या चर्चगेट कार्यालयात अवगत केले आहे. त्यांचे कंपनीत सर्व महत्वाचे परवाने तसेच बिल ऑफ एन्ट्री क्रमांक

३३१९२१९ असुन त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा लवकरात लवकर मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. अंकित इंम्पेक्स इंडियाचे व्यवस्थापक सुनिल बालकिशन गुप्ता यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी मे. विजया दुर्गा ट्रेडर्स, आंध्रप्रदेश यांचेकडून बिल क्र १२ अन्वये १२२ बाचके राजमा या कडधान्याचा साठा खरेदी करुन दिनांक २५/०५/२०१२ रोजी मे. शितल कोल्ड स्टोअरेजमध्ये ठेवला होता. त्यापैकी त्यांचे बिल क्रमांक ६८२० अन्वये दिनाक ०१/११/२०१२ रोजी ९२ बाचके विकले असुन उर्वरीत ३० बाचके सदर कोल्ड स्टोअरेजमध्ये बाकी आहे. सदर शिल्लक साठयाची महत्वाची कागदपत्रे सादर केली असल्याने त्यांना वितरण करण्याचे आदेश देण्यात यावेत अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

मे. शितल कोल्ड स्टोरेजचे लेखी निवेदनात, ते कोल्ड स्टोरेजचा व्यवसाय सन २००२ पासून सर्व नियमाचे पालन करुन करीत आहेत. या व्यवसायासाठी आवश्यक त्या सर्व कायदेशिर सरकारी परवानग्या त्यांच्याकडे आहेत. गेल्या १०-१२ वर्षाच्या त्यांच्या व्यवसायामध्ये त्यांनी कोणतेही बेकायदेशिर गैरकृत्य केलेले नाही. ते त्यांच्या ग्राहकांचा माल ज्यामध्ये फळे, कडधान्य, मसाले इत्यादी वस्तुंचा साठा योग्य तापमान राखून करीत असतात, ग्राहकांच्या मालाची साठवणूक करणे व योग्य तापमानामध्ये तो माल दिर्घ काळ टिकवणे हा त्यांचा व्यवसाय आहे. परंतू या मालाची त्यांचा मालक म्हणून कोणताच संबंध नसून या मालाच्या खरेदी विक्रीचा कोणताही व्यवहार ते करीत नाहीत. ते कोल्ड स्टोरेजची सेवा त्यांच्या ग्राहकांना देतात. ग्राहकांना त्यांनी साठवलेल्या मालाची रसीद ते देतात. तसे साठवणूकीसाठी ग्राहकांनी भरावयाचे चार्जेस ते त्यांच्याकडून बिल देऊन वसूल करतात. ज्या ज्या वेळी ग्राहक त्यांचा माल शितगृहामधून घेऊन जातात तेव्हा त्याने दिलेल्या डिलेव्हरी ऑर्डर प्रमाणे गेट पास देऊन तो माल ग्राहकांना दिला जातो. साठवणूक केलेल्या त्यांच्या सर्व ग्राहकांच्या मालाची नोंद असते. तसेच डिलेव्हरी दिलेल्या मालाचा रेकॉर्ड देखील असतो. ते करीत असलेल्या या व्यवसायाची संपूर्ण माहिती त्यांचे श्री. सईद शमसुद्दीन शेख यांनी आपण त्यांच्या कोल्ड स्टोरेजला भेट दिलीत तेव्हा आपणास तोंडी दिली आहे व तसे आपल्या नोटीसमध्ये नमूद केले आहे. आपण ज्या ग्राहकांचा माल डिलीव्हरी करण्यास मनाई केली आहे. तो माल आपणाकडून ऑर्डर मिळेपर्यंत ते कोणालाही देणार नाहीत याची ते खात्री देतात. तसेच आपल्या संपूर्ण चौकशीसाठी आवश्यक असलेले सहकार्य व मदत देण्याचे आश्वासन देतात, असे नमूद केले आहे.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात, त्यांच्या कार्यक्षेत्रातील जप्त साठ्याचे साठामालकांकडे महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ अन्वये अन्नधान्य/कडधान्याच्या घाऊक व्यापाराकरिता आवश्यक असलेल्या परवाना साठा मालकांनी धारण केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याचे तपशिल, परवानाधारकाचा पत्ता, परवानावरील वेगळे गोदाम नमूद आहे किंवा कसे ? असल्यास त्याचा तपशिल व नसल्यास जप्त करण्यात आलेल्या गोदामात साठा मालकांनी साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्र दिले आहे किंवा कसे ? तसेच परवाना असल्यास त्याची वैधता याबाबतचा साठामालक निहाय परिपूर्ण अहवाल सादर केला आहे.

दिनांक ०५/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स यांचे व्यवस्थापक मोहम्मद इम्रान पोची यांनी युक्तीवाद केला की, त्यांचे कंपनीने आयात केलेल्या कडधान्याच्या साठयाबाबत आवश्यक असणारे बिल ऑफ एन्ट्री व बिल ऑफ लेडींगची प्रत सादर करीत असुन त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. पुजा ट्रेडर्स या आस्थापनाचे मालक ललित मणिलाल चव्हाण यांनी युक्तीवाद केला की, ते मसाला आणि कडधान्याचे व्यवसायीक व डिपार्टमेंटल स्टोअर्स, हॉटेल, कॅन्टीन आणि कॅटरर्स यांना पुरवठा करीत आहेत. ऑर्डर नुसार ते साठा खरेदी करीत असुन खरेदी केलेला साठा खराब होवू नये तसेच त्यांना मिळालेली ऑर्डरप्रमाणे दिवाळी नंतर पुरवठा करावयाचा असल्याने त्यांनी कोल्ड स्टोअरेजमध्ये साठवणुक केल्याचे सांगितले. आपल्या कार्यालयास अवगत केल्याशिवाय ते इतर ठिकाणी साठवणुक करु शकत नसल्याची बाब त्यांना माहीत नाही. त्यामुळे यावेळेस त्यांना क्षमापित करुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती केली.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. गणेश ट्रेडर्स या संस्थेच्या वतीने त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी ललित मणिलाल चव्हाण यांनी युक्तीवाद केला की, ते मसाला आणि कडधान्याचे व्यवसायीक व डिपार्टमेंटल स्टोअर्स, हॉटेल, कॅन्टीन आणि कॅटरर्स यांना पुरवठा करीत आहेत. ऑर्डर नुसार ते साठा खरेदी करीत असुन खरेदी केलेला साठा खराब होवू नये तसेच त्यांना मिळालेली ऑर्डरप्रमाणे दिवाळी नंतर पुरवठा करावयाचा असल्याने त्यांनी कोल्ड स्टोअरेजमध्ये साठवणुक केल्याचे सांगितले. आपल्या कार्यालयास अवगत केल्याशिवाय ते इतर ठिकाणी साठवणुक करु शकत नसल्याची बाब त्यांना माहीत नाही. त्यामुळे यावेळेस त्यांना क्षमापित करुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती केली.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ०२/११/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. शितल कोल्ड स्टोरेज, प्लॉट नं. सी/२०, टी.टी.सी. इन्डस्ट्रीअल एरीया, एम.आय.डी.सी., पावणे, नवी मुंबई - ७३ या ठिकाणी धाड टाकून घेण्यात आलेल्या तपासणीमध्ये विविध कडधान्यांचा साठा हा साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदरचा साठा पुढील तपासणीच्या अधिन राहून जप्त करुन मे. शितल कोल्ड स्टोरेज चे मॅनेजर श्री. सईद शममुद्दीन शेख यांचेकडे सुपूर्द करण्यात आला व सदरचा साठा पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत. त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता असुन सदर अनुसुचित वस्तुंचे व्यापार करणारे किरकोळ व्यापाऱ्यांना दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ अन्वये किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

मे. ताज ॲग्रो कमोडिटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जमनादास चांद्रा यांनी सुनावणीचेवेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा ३७० बाचक्यांमधील पिवळे मसुरडाळीचा १८.५०० मे.टन बिल ऑफ एन्ट्री क्रमांक ३३१९२१९ अन्वये आयात केलेल्या साठयापैकी असल्याचे सांगितले. मे. ताज ॲग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांनी सादर केलेल्या आयात संबंधीचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जप्त साठ्यापैकी पिवळे मसुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ३३१९२१९ अन्वये १७३६.९० क्विंटल सुटा साठा आयात केल्याचे दिसुन येते. त्यापैकी त्यांनी मे. शितल कोल्ड स्टोअरेज मध्ये साठवणूक केल्याचे सांगितले आहे. मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स यांचे व्यवस्थापक मोहम्मद इम्रान पोची यांनी युक्तीवाद केला की, त्यांचे कंपनीने आयात केलेल्या कडधान्याच्या साठयाबाबत आवश्यक असणारे बिल ऑफ एन्ट्री व बिल ऑफ लेडींगची प्रत सादर करीत असल्याचे सांगुन त्यांचा जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली. मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स यांनी सादर केलेल्या आयात संबंधीचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता, जप्त साठ्यापैकी हिरवा वाटाणा या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७७२८२८४ अन्वये २३०० बाचक्यांमधील ११६१.११ क्विंटल हिरवा वाटाणा आयात केल्याचे दिसुन येते. त्यापैकी त्यांनी मे. शितल कोल्ड स्टोअरेज मध्ये साठवणूक केल्याचे सांगितले आहे.

आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. परंतू मे. ताज ॲग्रो कमोडिटीज प्रा.लि. वगळता मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला हिरवा वाटाणा या कडधान्याचा साठा आयात केल्याबाबतचे या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर केले नसल्याचे आढळून आले आहे. तथापि, मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबत सादर केलेल्या कायदेशीर कागदपत्रांवरुन त्यांचा आयात केलेला साठा वैध असल्याचे दिसून येते.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये आयातदारास त्यांनी आयात केलेल्या साठ्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र सादर करुन अवगत करणे क्रमप्राप्त आहे. तथापि मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स या आयातदाराने सुनावणीच्या दरम्यान त्यांना सदरची प्रक्रीया अवगत नसल्याचे सांगून सद्य:स्थितीत शिल्लक असलेला व यापूढील काळात आयात करण्यात येणाऱ्या साठ्याबाबत नियमीतपणे मासिक विवरणपत्र सादर करणार असल्याचे सांगून त्यांनी आयात केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक न केल्याचे सांगून सदर साठ्याची नियमीतपणे विक्री करुन सद्य:स्थितीत नमुद गोदामावर त्यापैकीच

शिल्लक असलेला साठा हा जप्त करण्यात आलेला असल्याचे सांगीतले आहे. यावरुन आयातदारानी आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती या कार्यालयास सादर न केल्याची चुक मान्य केली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेता जप्त साठ्याच्या मालकांनी सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेला त्यांचा विवीध कडधान्याचा साठा हा वैध असल्याने शासन परिपत्रकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करण्याच्या अटीवर मे. ताज ॲग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांचा सिल करण्यात आलेला ३७० बाचक्यांमधील १८५.०० क्विंटल पिवळे मसुर या कडधान्याचा संपूर्ण साठा व मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स यांचा सिल करण्यात आलेला ८६५ बाचक्यांमधील ४३२.५० क्विंटल हिरवा वाटाणा या कडधान्याचा संपूर्ण साठा त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तीधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे " असे स्पष्ट नमुद केले आहे.

मे. पुजा ट्रेडर्स व मे. गणेश ट्रेडर्स या आस्थापनांच्या मालकांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद वेअरहाऊसमध्ये तुरडाळ या कडधान्याच्या साठयाची साठवणुक केले असल्याचे सांगितले. उपरोक्त साठामालकांनी निवेदनासोबत सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रांच्या छायांकित प्रतींचे अवलोकन करता, मे. पुजा ट्रेडर्स व मे. गणेश ट्रेडर्स या दोन्ही आस्थापनांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये अनुक्रमे ५९० व ५८७ या क्रमांकाचे खाद्यतेलबियाच्या व्यवसायाकरीता घाऊक परवाने धारण केले आहेत. तसेच मे. अंकित इंम्पेक्स इंडिया या कंपनीने राजमा या कडधान्याच्या साठयाच्या पुराव्यादाखल मे. श्री विजया दुर्गा ट्रेडर्स, आंध्रप्रदेश यांच्याकडून साठा खरेदी केल्याचे बिल सादर केले असुन या व्यतिरीक्त राजमा या अनुसुचीत वस्तुच्या व्यवसायाकरीता आवश्यक असणारा घाऊक परवाना त्यांनी धारण केले नसल्याचे दिसुन येते. उपरोक्त विवेचन व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता, मे. पुजा ट्रेडर्स व मे. गणेश ट्रेडर्स या

दोन्ही आस्थापनांनी धारण केलेला घाऊक परवाना हा डाळी/कडधान्यासाठी नसुन तो खाद्यतेलबियांच्या व्यवसायाकरीता असल्याचे दिसुन येते. तसेच मे. अंकित इंम्पेक्स इंडिया या कंपनीने डाळी/कडधान्याच्या व्यवसायाकरीता घाऊक परवाना धारण केला नसल्याचे दिसुन येत आहे. तसेच उपरोक्त साठा मालकांनी डाळी/कडधान्याच्या घाऊक व्यवसायाकरीता आवश्यक असणाऱ्या परवान्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडे अर्जही सादर न केल्याचे दिसुन येत आहे ही बाब गंभीर आहे. उपरोक्त तिनही आस्थापनांचा विविध कडधान्याचा साठा हा विनापरवाना खरेदी करुन अवैध साठवणुक केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदींचा भंग केल्याचे सिध्द होत आहे. सबब, मे. पुजा ट्रेडर्स, मे. गणेश ट्रेडर्स व मे. अंकित इंम्पेक्स इंडिया यांचा जप्त करण्यात आलेला कडधान्यांचा संपुर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त/सिल करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी मे. ताज ॲग्रो कमोडिटीज प्रा.लि. व मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स यांचा सिल करण्यात आलेला कडधान्याचा संपूर्ण साठा त्यांना परत करण्यात यावा. तथापी, केंद्र शासनाच्या अधिसुचनाव्दारे निर्गमित करण्यात आलेल्या सुचनांनुसार तसेच दिनांक २० मे, २००८ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करावी.

२) प्रस्तूत प्रकरणी, मे. पुजा ट्रेडर्स, मे. गणेश ट्रेडर्स व मे. अंकित इंम्पेक्स इंडिया यांचा जप्त करण्यात आलेला कडधान्यांचा संपुर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण साठा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावून येणारी रक्कम उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor &

Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. शितल कोल्ड स्टोरेजचे मालक/भागीदार
२) मे. ए. रज्जाक ॲण्ड सन्स
३) मे. अंकित इंम्पेक्स, दिल्ली
४) मे. गणेश ट्रेडर्स
५) मे. पुजा ट्रेडर्स
६) मे. ताज एग्रो

(मे. शितल कोल्ड स्टोरेज यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.